# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

Estd. 1962
NAAC 'A' Grade

## (अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी प्रवेशित असणा–या नियमित विद्यार्थ्यांच्यासाठी)

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. 28 ऑगस्ट, 2020 रोजी दिलेल्या आदेशानुसार व त्या अनुषंगाने मा. कुलपती तथा राज्यपाल व महाराष्ट्र शासनाने दि. 03 सप्टेंबर, 2020 रोजी सूचित केल्याप्रमाणे **अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी नियमित प्रवेशित असणा–या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या लेखी** परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम वर्ष/सत्राच्या सर्व अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 10 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू होतील. (सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्र जाहीर करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना वेळापत्रक व हॉलतिकीट संगणक प्रणालीमधून उपलब्ध करून देण्यात येईल)
2. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने Online/Offline स्वरूपात संगणक प्रणालीमधून होईल.
3. सदर परीक्षा Online संगणक प्रणालीमधून होणार असल्याने परीक्षेस प्रविष्ठ होणा–या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालयामार्फत/अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अपडेट करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेसाठी आपला स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक संबंधीत अभ्यासकेंद्राकडून दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अद्ययावत करण्यात यावा.
   **(विशेष सूचना – सदरची माहिती परीक्षेकामी वापरण्यात येणार असल्याने अचूक माहिती देणेची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. तसेच विद्यार्थ्यांनी यासाठी परस्पर विद्यापीठाशी संपर्क करू नये.)**
4. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/301**
**दिनांकः–11 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

Estd. 1962
NAAC 'A' Grade

### (अंतिम वर्षास प्रवेशित असलेले व अनुषेश (Backlog) असलेल्या विद्यार्थ्यांच्यासाठी)

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. 28 ऑगस्ट, 2020 रोजी दिलेल्या आदेशानुसार, त्या अनुषंगाने मा. कुलपती तथा राज्यपाल व महाराष्ट्र शासनाने दि. 03 सप्टेंबर, 2020 रोजी सूचित केल्याप्रमाणे **अंतिम वर्षास प्रवेशित असलेले व अनुशेष (Backlog) असलेल्या सर्व अभ्यासकमाच्या विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत लेखी** परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकर मंडळानी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार सर्व अभ्यासकमामधील अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या अनुशेष (Backlog) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासकमाच्या परीक्षा दि. 01 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू होतील. (परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.)
2. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासकमाच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर सुयोग्य पध्दतीने होईल.
3. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासकमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयातील/अधिविभागातील शिक्षकांनी तयार करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजित करण्यात येवून सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. तसेच परीक्षेच्या अनुषंगाने संपूर्ण कार्यवाही महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर करणेची आहे.
4. ज्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ज्या त्या महाविद्यालय अभ्यास केंद्रावर घेण्यात येईल. सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकांनी तयार करण्यात याव्यात. एखाद्या महाविद्यालयामध्ये दूरशिक्षण अभ्यासकेंद्राकडील विषय शिकविला जात नसल्यास नजिकच्या महाविद्यालयातील शिक्षकांकडून प्रश्नपत्रिका तयार करून घ्याव्यात. तसेच उत्तरपत्रिका तपासून सदर विद्यार्थ्यांचे गुण संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावेत. (सदर बाबत दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सहकार्य/मार्गदर्शन घेण्यात यावे.)
5. विद्यापीठाकडे प्राप्त होणा-या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत.
6. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.
7. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ कं.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/** 302
**दिनांकः—11 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक— सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष — संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी